पीएच. डी. संशोधन आराखडा

ग्रामीण भागातील अनुसूचित जातींमधील महिलांच्या स्वच्छता व आरोग्य विषयक समस्यांचा विश्लेषणात्मक अभ्यास : विशेष संदर्भ नांदेड जिल्हा

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

अंतर्गत मानव्यविद्या शाखेतील समाजशास्त्र या विषयातील विद्यावाचस्पती पदवीसाठी सादर करावयाच्या शोध प्रबंधाचा संशोधन पूर्व आराखडा

संशोधक

हानवते विजय गौतम

सामाजिकशास्त्रे संकुल

स्वा.रा.ती.म.विद्यापीठ,नांदेड

मार्गदर्शक

प्रा.डॉ.आर.एम.मांजरे

समाजशास्त्र विभाग प्रमुख

शिवाजी महाविद्यालय, उदगीर, जि.लातूर

संशोधन केंद्र

सामाजिकशास्त्रे संकुल, स्वा.रा.ती.म.विद्यापीठ,नांदेड

प्रस्तावना

मानव संसाधन विकासामध्ये आरोग्य आणि स्वच्छता या दोन्ही घटकांना अतिशय महत्त्व आहे. ग्रामीण समाजाचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास करताना विविध समस्या निदर्शनास येतात. त्यामध्ये आरोग्य आणि स्वच्छता ही समस्याच आहे. प्रामुख्याने दलित स्त्रियांच्या स्वच्छता व आरोग्य समस्यांचा अभ्यास करण्याचे निश्चित केले.

समाजशास्त्र ही ज्ञान शाखेतील महत्त्वपूर्ण अशी संस्था मानली जाते. सामाजिक जीवनाचे चित्रण समाजशास्त्रात आपल्याला ठळकपणे आढळते. म्हणूनच समाजाच्या विविध अंगांचा अभ्यास समाजशास्त्रात केला जातो. सामाजिक जीवन उंचावण्यामध्ये आणि सामाजिक बदल घडवण्यामध्ये समाजशास्त्र नेहमीच महत्त्वाची भूमिका बजावत असते. त्यामुळेच आजच्या काळात समाजशास्त्राच्या विविध शाखा उदयास आलेल्या आपणास आढळून येतात. ग्रामीण नागरी आणि आदिवासी समुदायाच्या सामाजिक जीवनाला दिशा देण्याचे कार्य समाजशास्त्राने केले आहे. समाजाचा साकल्याने व व्यापक अशा दृष्टीने अभ्यास करणाऱ्या शास्त्राला समाजशास्त्र असे म्हणतात. समाजाच्या अभ्यासाला सुरुवात फार प्राचीन काळापासून झालेली आहे पण तरीसुद्धा समाजशास्त्राला अलीकडचे शास्त्र म्हणतात याचे कारण असे की वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून वैज्ञानिक पद्धतीने समाजाच्या

अभ्यासाची सुरुवात अलीकडच्या काळात सुरू झाली आहे. समाजाचा साकल्याने अभ्यास करून समाज विषयक शास्त्रीय निष्कर्ष काढण्याची वृत्ती इसवी सनाच्या एकोणिसाव्या शतकापासून सुरू झाली.

इसवी सनाच्या १८ व्या शतकात स्वच्छता व आरोग्यविषयक समस्यांच्या संशोधनाला सुरुवात झाली. पुढील काळात या संशोधनामध्ये वाढ होत गेली. यातूनच आरोग्याचे समाजशास्त्र जन्माला आले.या ज्ञान शाखेने समाज आणि आरोग्य यांची सांगड घालत नव्या संशोधनाला सुरुवात केली. त्यामुळे समाजातील स्त्री पुरुष यांच्या आरोग्य आणि स्वच्छते विषयक चर्चा होऊ लागल्या. समाजातील सर्वच व्यक्तींना आरोग्य संपन्न जीवन जगता यावे म्हणून समाजातील राज्यसंस्थेतर्फे प्रयत्न केले जातात. प्रत्येक राज्याच्या सरकारातील आरोग्य खात्याच्या मार्फत राज्यातील पर्यायाने समाजातील व्यक्तींच्या आरोग्याची एकीकडे काळजी घेताना दुसरीकडे तिच्या एकूण आरोग्याची जपणूकही केली जाते. समाजशास्त्रज्ञांच्या मतानुसार व्यक्तींच्या कायमस्वरूपाच्या सामाजिक संबंधाच्या पूर्ततेसाठी समाजात विविध प्रकारच्या सामाजिक संस्था जन्माला आलेल्या आहेत. समाजात व्यक्तीने जीवन कसे जगावे या संबंधाचे निकष सर्वसाधारणपणे या सामाजिक संस्था ठरवतात या निकषांपैकी एक निकष आहे आरोग्य प्रत्येक समाजातील प्रत्येक व्यक्तीचे जीवन आरोग्य संपन्न असावे असे सर्वच व्यक्तींना वाटत असते.या आरोग्याशी लिंग जात

आणि आर्थिक परिस्थिती कशी संबंधित आहे. याचाही विचार करण्यात येऊ लागला. प्रत्येक माणसाच्या आरोग्यविषयक समस्या ह्या त्याच्या जातीवरून समुदायावरून आणि लिंगावरून ठरत असल्याचे आढळून येते.

भारतातील बहुतांश समाज ग्रामीण भागात वास्तव्यास आहे. नागरी जीवनापेक्षा ग्रामीण भागातील जीवनशैली ही वेगळया स्वरूपाची आहे. जात, धर्म, पंथ, भाषा, प्रथा, परंपरा यांचा मोठा प्रभाव ग्रामीण समाजावर आजही कायम असलेला आढळतो. भारतीय समाज व्यवस्थेत स्त्रीचे स्थान पुरुषांच्या तुलनेत प्रत्येक क्षेत्रात निम्न राहिले आहे. येथील प्रस्थापित व्यवस्थेने स्त्रियांवर अनेक जाचक बंधने लागली त्यामुळे त्यांचे कार्यक्षेत्र मर्यादित झाले. विशेषता दलित दलित स्त्रिया या व्यवस्थेच्या दुहेरी बळी ठरल्या. त्यामुळे त्यांना सामाजिक सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक आणि राजकीय दृष्ट्यासतत डावलण्यात आले. त्यांची अवेहलना करण्यात आली. त्यांना त्यांचे हक्क अधिकार मिळवून देण्यासाठी भारतात महात्मा ज्योतिराव फुले डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर, पेरियार यांसारख्या समाजसुधारकांनी प्रयत्न केले. आज देश स्वतंत्र होऊन ७० वर्षे होऊन गेली आहेत तरीही ग्रामीण भागातील दलित महिलांच्या प्रश्न आणि समस्या सुटलेल्या नाहीत. दलित महिलांच्या सामाजिक राजकीय समस्यांबरोबरच त्यांच्या आरोग्याच्या व स्वच्छतेच्या समस्या

ग्रामीण भागात आजही कायम असलेल्या आढळतात. त्यामुळेच त्यांच्या या समस्यांचा शोध घेण्यासाठी आणि त्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी संशोधन होणे आवश्यक वाटते. म्हणूनच “ग्रामीण भागातील दलित महिलांच्या स्वच्छता व आरोग्य विषयक समस्यांचा विश्लेषणात्मक अभ्यास : विशेष संदर्भ नांदेड जिल्हा” हा विषय संशोधकाने संशोधनात्मक अभ्यास करण्यासाठी हाती घेतला आहे.

संशोधन विषयाची निवड :

आजच्या एकविसाव्या शतकातही ग्रामीण भागातील महिलांच्या समस्या निर्माण झालेले आहेत त्यातही दलित महिलांची परिस्थिती अत्यंत बिकट आहे. संशोधक स्वतः ग्रामीण भागात राहत असल्यामुळे आपल्या आजूबाजूला राहणाऱ्या महिलांच्या समस्या अगदी जवळून पाहिलेल्या आहेत. दलित महिलांना आरोग्य आणि स्वच्छते विषयी कोणत्याही सोई सुविधा उपलब्ध नसल्यामुळे त्यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. त्यामुळेच त्यांच्या या समस्यांचा अभ्यास करण्यासाठी संशोधकाने या अभ्यास विषयाची निवड केली आहे.

संशोधन प्रश्न :

प्रस्तुत संशोधन हे ग्रामीण भागातील दलित महिलांच्या आरोग्य आणि स्वच्छतेचे स्थिती जाणून घेण्याच्या दृष्टिकोनातून आवश्यक आहे.

१) ग्रामीण भागातील दलित महिलांच्या आरोग्य व स्वच्छतेचे स्थिती कशी आहे ?

२) नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण दलित महिलांच्या आरोग्य व स्वच्छतेच्या समस्याची तीव्रता किती आहे ?

३) ग्रामीण भागातील दलित महिलांच्या स्वच्छता व आरोग्य समस्यांना त्यांची सामाजिक आर्थिक स्थिती जबाबदार आहे ?

४) ग्रामीण भागातील दलित महिलांच्या आरोग्य व स्वच्छता विषयक समस्यांच्या निर्मूलनासाठी सरकारची धोरणे कोणती भूमिका निभावतात ?

संशोधन विषयाची उद्दिष्टे :

प्रस्तुत संशोधन कार्य करण्यासाठी पुढील उद्दिष्टे ठेवण्यात आली आहेत.

१) ग्रामीण भागातील दलित महिलांच्या आरोग्य व स्वच्छतेच्या स्थितीचा अभ्यास करणे.

२) ग्रामीण भागातील दलित महिलांच्या आरोग्य आणि स्वच्छतेच्या समस्यांचा अभ्यास करणे.

३) ग्रामीण भागातील दलित महिलांच्या आरोग्य आणि स्वच्छतेच्या समस्यांच्या व परिणामांचा अभ्यास करणे.

४) ग्रामीण भागातील दलित महिलांच्या आरोग्य आणि स्वच्छतेस सामाजिक आणि आर्थिक परिस्थिती जबाबदार असते, त्याचा अभ्यास करणे.

५) ग्रामीण भागातील दलित महिलांच्या आरोग्य आणि स्वच्छतेच्या संदर्भात शासनाच्या विविध योजनांचा अभ्यास करणे.

संशोधनाची गृहितके :

प्रस्तुत अभ्यास विषयाच्या अनुषंगाने पुढील गृहीतके ठरवण्यात आली आहेत. ही गृहितके समोर ठेवूनच प्रस्तुत विषयाचे संशोधन कार्य केले जाणार आहे.

१) ग्रामीण भागातील दलित महिलांच्या आरोग्याचे व स्वच्छतेची स्थिती दुय्यम आहे.

२) ग्रामीण भागातील दलित महिलांच्या आरोग्य आणि स्वच्छतेच्या समस्या आहेत.

३) ग्रामीण भागातील दलित महिलांच्या आरोग्य आणि स्वच्छतेस विविध कारणे जबाबदार आहेत.

४) ग्रामीण भागातील दलित महिलांच्या आरोग्य आणि स्वच्छतेस आर्थिक आणि सामाजिक परिस्थिती जबाबदार आहे.

५) ग्रामीण भागातील दलित महिलांच्या आरोग्य आणि स्वच्छता करिता शासनाने विविध योजना कार्यान्वित केल्या आहेत.

संशोधन आराखडा :

ग्रामीण भागातील दलित महिलांच्या आरोग्य आणि स्वच्छतेचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास करण्याचे निश्चित केले. प्रस्तुत विषयाचा अभ्यास करताना संशोधन आराखडा निश्चित करावा लागतो. संशोधन आराखड्याचे विविध प्रकार

आहेत. संशोधनाचा विषय आणि उद्दिष्टे लक्षात घेऊन वर्णनात्मक संशोधन आराखड्याचाअवलंब करण्यात येणार आहे.

संशोधन विषयाचे महत्व :

१) ग्रामीण भागातील दलित स्त्रियांचे आरोग्य आणि स्वच्छता विषयक स्थिती जाणून घेण्याच्या दृष्टिकोनातून महत्व अधोरेखित करता येईल.

२) दलित स्त्रियांचे आरोग्य आणि स्वच्छता यासंदर्भात त्यांची जागरूकता, व दृष्टिकोन समजून घेता येईल.

३) दलित स्त्रिया आरोग्य आणि स्वच्छता या संदर्भात कोणती काळजी घेतात. आरोग्य तंदुरुस्त आहे काय? स्वच्छतेला प्राधान्य देतात काय? यासंदर्भातील माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने महत्त्व विशद करता येईल.

४) दलित यांच्या आरोग्य आणि स्वच्छतेच्या संदर्भात शासनाच्या योजनांचे मूल्यमापन करण्याच्या दृष्टीने महत्त्व सांगता येईल.

अध्ययन क्षेत्र :

प्रस्तुत विषयाचा अभ्यास करण्यासाठी अध्ययन क्षेत्राची निवड करणे गरजेचे असते. त्यामुळे संशोधनकर्त्याने अध्ययन क्षेत्र म्हणून नांदेड जिल्ह्याची निवड केली आहे. कारण अध्ययन क्षेत्राची निवड न केल्यास संशोधन कार्य व्यवस्थित होत नाही. त्यामुळे संशोधन कार्य दिशाहीन होऊ शकते. म्हणूनच संशोधनाला मर्यादा निश्चित

करण्यासाठी अध्ययन क्षेत्राची निवड करावी लागते त्यामुळे प्रस्तुत संशोधनासाठी नांदेड जिल्ह्याची निवड करण्यात आली आहे. नांदेड जिल्ह्यामध्ये सोळा तालुके आहेत त्या प्रत्येक तालुक्यातील सहेतुक नमुना निवडीच्या माध्यमातून काही गावातील उत्तर दात्यांची निवड करून अध्ययन करण्यात येणार आहे.

नमुना निवड :

प्रस्तुत विषय दलित महिलांच्या आरोग्य आणि सुचितीच्या संदर्भात आहे. या विषयाचा अभ्यास करण्यासाठी नमुना निवडणे अत्यंत गरजेचे असते. नमुना निवडण्याच्या जनगणना पद्धती आणि नमुना निवड पद्धती या दोन मुख्य आहेत. संशोधनकर्त्यांनी या विषयाचा अभ्यास करण्यासाठी नमुना निवडीचा उपयोग करणार आहे. संभाव्यता आणि असंभवता या दोन नमुना निवडीच्या पद्धती आहेत. संभाव्यता नमूना निवडीतील उद्देश पूर्ण नमुना निवडीचा अवलंब करण्यात येईल. संशोधक विशिष्ट घटकांना संशोधन विषयक उद्दिष्टांना अनुसरून घटकांची निवड करतो, यास उद्देशपूर्ण नमुना असे म्हणतात. नांदेड जिल्ह्यात एकूण सोळा तालुके आहेत. प्रत्येक तालुक्यातून २० उत्तर दात्यांची निवड करण्यात येणार आहे. २०x१६= ३२० म्हणजेच एकूण ३२० उत्तरदात्यांची निवड करण्यात येणार आहे.

तथ्य संकलनाचे स्त्रोत :

प्रस्तुत संशोधन कार्य पूर्ण करण्यासाठी प्राथमिक आणि दुय्यम अशा साधनसामग्रीचा वापर करण्यात येणार आहे. प्राथमिक स्त्रोतांमध्ये मुलाखत अनुसूची

यांचा समावेश असेल तर दुय्यम स्त्रोतांमध्ये जिल्हा आरोग्य विभागाचे अहवाल, शासकीय व स्वयंसेवी संस्थांच्या अहवालाचे विश्लेषण, पूर्वीच्या संशोधनातील आकडेवारीचा वापर, वेगवेगळी नियतकालिके, मासिके तसेच महत्त्वपूर्ण ग्रंथांचा वापर प्रस्तुत संशोधनासाठी करण्यात येणार आहे.

निवडलेली संशोधन पद्धती :

प्रस्तुत अभ्यास विषयाचे संशोधन कार्य पार पाडण्यासाठी गुणात्मक आणि संख्यात्मक या संशोधन पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे. तसेच मुलाखत अनुसूचीमधून मिळालेली माहितीची अभ्यासपूर्ण मांडणी करण्यासाठी विश्लेषणात्मक संशोधन पद्धती आणि समाजशास्त्रीय संशोधन पद्धतीचा वापर प्रस्तुत संशोधनासाठी करण्यात येणार आहे.

प्रकरणांची रूपरेषा :

प्रस्तुत संशोधनासाठी पुढील प्रमाणे प्रकरणांची मांडणी करण्यात येणार आहे.

प्रकरण पहिले- प्रस्तावना

प्रस्तुत प्रकरणामध्येसंशोधन विषयाची निवड का करण्यात आली आहे त्याचबरोबर या संशोधन विषयाचे काय महत्त्व आहे याचे सविस्तर विवेचन करून संशोधनाची उद्दिष्टे, संशोधनाची गृहितके, संशोधन साधनसामग्रीचे संकलन तसेच

संशोधनासाठी वापरण्यात येणाऱ्या संशोधन पद्धती,संशोधनाचे क्षेत्र आणि मर्यादा, प्रकरणांची मांडणी यावर सविस्तर विवेचन करण्यात येणार आहे.

प्रकरण दुसरे- संदर्भ साहित्याचा आढावा

प्रस्तुत प्रकरणामध्ये दलित महिलांच्या आरोग्य व स्वच्छतेच्या समस्येविषयी यापूर्वी झालेल्या संशोधन कार्याचा आढावा घेऊन प्रस्तुत संशोधन कार्याची गरज यावर चर्चा करण्यात येणार आहे.

प्रकरण तिसरे-नांदेड जिल्ह्याची वैशिष्ट्ये आणि दलित महिला

या तिसऱ्या प्रकरणांमध्ये नांदेड जिल्ह्याच्या वैशिष्ट्यांचा अभ्यास करून ग्रामीण भागातील दलित महिलांच्या सामाजिक आणि सांस्कृतिक स्थितीचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण चौथे-

दलित महिलांच्याआरोग्य व स्वच्छते विषयक समस्यांचे विश्लेषण व निर्वचन

प्रस्तुत प्रकरणामध्ये ग्रामीण भागातील दलित महिलांना आरोग्य आणि स्वच्छते विषयक निर्माण झालेल्या समस्यांचा अभ्यास करून त्याचे सविस्तर विश्लेषण व निर्वचन सारणीच्या माध्यमातून करण्यात येईल.

प्रकरण पाचवे– सारांश, निष्कर्ष आणि शिफारशी

संशोधनाच्या या शेवटच्या प्रकरणात संशोधनाचा सारांश सांगून संशोधनाअंती हाती आलेल्या निष्कर्षांची मांडणी करण्यात येईल. त्याचबरोबर नांदेड

जिल्ह्यातील ग्रामीण भागातील दलित महिलांच्या आरोग्य विषयक आणि स्वच्छता विषयक सुधारण्यासाठी आवश्यक असलेल्या शिफारशी सुचवण्यात येतील.

***

संदर्भ सूची.

१.कुलकर्णी पी.के. आरोग्य आणि समाज, डायमंड पब्लिकेशन पुणे, प्रथम आवृत्ती२००८.

२. World Bank, Improving Women’s Health in India, Washington D.C., May 1996. (PDF).

३. Sarojini N.B., et al., Women’s Right to Health, National Human Rights Commission, New Delhi. 2006. (PDF).

४.महाजन संजय, ग्रामीण विकासाचे आयाम, राजवीर प्रकाशन, परभणी, प्रथम आ.२०१३.

५. कनकदंडे श्वेतांबरी, ग्रामीण महिलांचे आरोग्य, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद प्रथम आवृत्ती २०१९.

६. भाके विद्या, आधुनिक भारतातील दलित दृष्टिकोन आणि मुल्ये, डायमंड पब्लिकेशन पुणे, प्रथम आवृत्ती २००८.

७. गायकवाड महेंद्र, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्री विषयक लेखन, संघर्ष प्रकाशन नागपूर, प्रथम आवृत्ती २०१८.

८. भागवत विद्युत, स्त्री प्रश्नांची वाटचाल, प्रतिमा प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती २००४.

९. नाडगोंडे गुरुनाथ, ग्रामीण समाजशास्त्र, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती१९७६.

१०. शिंदे वी.रा. भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न कौशल्य प्रकाशन औरंगाबाद द्वितीय आवृत्ती२००३.

संशोधक

हानवते विजय गौतम
सामाजिकशास्त्रे संकुल
स्वा.रा.ती.म.विद्यापीठ,नांदेड

मार्गदर्शक

प्रा.डॉ.आर.एम.मांजरे
समाजशास्त्र विभाग प्रमुख
शिवाजी महाविद्यालय, उदगीर,जि.लातूर